**MHKO120000132015**

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.७/२०१५</u>**
(CNR No.MHKO120000132015)

## <u>निशाणी क्र.११६ खाली आदेश</u>

वादी यांनी सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ४१ नियम ५, आदेश ४३ आणि कलम १५१ प्रमाणे निशाणी क्र.९५ वरील झालेला आदेश अपील कालावधीपर्यंत स्थगित करणेबाबत दाखल केला आहे.

**<u>दावा मिळकतींचे वर्णन</u> :-**

(अ) मौजे तांबाळे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील वादीचे वडिलार्जित एकत्र हिंदु ख्रिश्चन कुटूंबियाची अविभक्त गट क्र.११८ सिदोबाचा नंबर या नावाने ओळखणारी शेत जमिनी त्याचे क्षेत्र हे ०-३३ आर, पो.ख. ०-०६ असे एकुण ०-३९ आर त्यासी आकार रु. ०-२५ पैसे पुर्ण गट क्रमांक.

(ब) ग्रामपंचायत तांबाळे येथील बाजारपेठ ग्रामपंचायत मिळकत क्र.१४७/१, १४७/२, व १४७/३ चे वादी प्रतिवादी क्र.१ ते ५ चे वाडवडिलार्जित एकत्र कुटुंबाचे घर मिळकती.

(क) प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.७ व ८ यांचे नांवे तथाकथित पोकळ, बनावट बिन कब्जाचे व बिन भरण्याचे करुन दिलेले रजिस्टर खरेदीखत क्र.१६१५ दि.१३/११/२०१४ चे खरेदीखत.

(ड) प्रतिवादी क्र.६ यांनी प्रतिवादी क्र.१ यांचेकडुन फसवून करुन घेतलेले तथाकथित खोटे बनावट बेकायदेशिर पोकळ व बिनकब्जाचे रजिस्टर खरेदीखत क्र.१०३/२००८ दि.२४/०१/२००८ चे खरेदीखत.

(इ) प्रतिवादी क्र.९ व १० यांनी प्रतिवादी क्र.११ यांना दावा प्रलंबित आहे याची माहिती असतानाही महाराष्ट्र तुकडेजोड तुकडे बंदी कायद्यातील व अन्य तरतुदीतील कलमाचा भंग करुन खोटे बनावट व बेकायदेशिर आणि बिनकब्जाचे पोकळीस्त व कागदोपत्री करुन दिले रजिस्टर खरेदीपत्र क्र.९१७/२०२२ दि.१७/०५/२०२२ चे खरेदीखत.

(येणेप्रमाणे वर्णनाची (अ) ते (इ) मध्ये नमुद केलेल्या मिळकतींना व दस्तांना सोयीसाठी यापुढे **'दावा मिळकत'** असे संबोधण्यात आले आहे. )

**<u>वादी यांचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** -

०२. वादी यांनी उपरोक्त दावा मिळकतींसदर्भात दावा दाखल केला असुन त्यामध्ये प्रतिवादी क्र.११ विरुध्द दावा मिळकत १अ मध्ये असलेल्या वादींच्या शांततामय कब्जेवहिवाटीस स्वतः अगर तर्फे इसमांकरवी हरकत अडथळा अगर बाधा निर्माण होईल असे कोणतेही कृत्य करु नये, त्यामध्ये पोलिस बंदोबस्तात व अनाधिकाराने बेकायदा आपला नसलेला कब्जा करु नये, दावा मिळकतीत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये, त्यातील झाडे तोडु नयेत व दावा मिळकत इतर कोणासही खरेदी, विक्री, दान, गहाण देवु नये आणि दावा मिळकतीच्या स्वरुपात बदल होईल, असे कोणतेही कृत्य करु नये म्हणुन तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दिला होता. सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे.

०३. सदर निशाणी क्र.९५ वरील आदेशाविरुध्द वादी यांना मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे अपील दाखल करणेचे आहे. सबब निशाणी क्र.९५ वरील झालेला आदेश हा अपील कालावधीपर्यंत स्थगित ठेवणेबाबत तसेच प्रतिवादी क्र.११ यांनी दि.११/११/२०२३ ते दि.१९/११/२०२३ चे दिपावली सुट्टीचे कालावधीत सदर आदेशाचा गैरफायदा घेवुन कोणतेही बांधकाम करु नये याकरीता जैसे-थे परिस्थिती ठेवणेत यावी अशी विनंती वादींनी केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.११ यांनी निशाणी क्र.११८ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारलेला आहे. थोडक्यात प्रतिवादीचे असे म्हणणे आहे की, प्रस्तुत प्रतिवादी यांना दावा मिळकतीचा कायदेशिर कब्जा नोंदणीकृत खरेदीदस्ताने मिळाला असलेने

व त्याबाबतची नोंद ७/१२ पत्रकी मालक व कब्जेदार म्हणुन कायम आहे. प्रस्तुत अर्जाचे कामी जैसे थे चा आदेश पारीत केलेस प्रतिवादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०५. वादीतर्फे विधिज्ञ श्री .एस.डी.भोसले तसेच प्रतिवादी क्र.११ तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.सोरटे यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील परिस्थितीचे अवलोकन केले असता, खालील प्रश्नबिंदू माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी निशाणी क्र.९५ वरील झालेला आदेश अपील कालावधीपर्यंत स्थगित करणेबाबतचा आदेश मिळणेस पात्र आहेत काय ? | : | नकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**प्रश्नबिंदु क्रमांक १ व २ करिता -**

**( अपिल कालावधीपर्यंत स्थगिती आदेश व आदेश )**

०६. प्रश्नबिंदु क्र.१ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता सदर मुद्दे चर्चेकरीता एकत्रित विचारात घेणेत आलेले आहेत.

०७. वादींतर्फे विधिज्ञ श्री .एस.डी.भोसले व प्रतिवादी क्र.११ तर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.सोरटे यांचा युक्तीवाद ऐकला.

०८. मान्य परिस्थितीनुसार, दोन्ही बाजुंनी दाखल केलेली सर्व कागदपत्रे व दोन्ही बाजुच्या विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद लक्षात घेवुन या न्यायालयाने निशाणी क्र.९५ वरील अर्ज गुणदोषावर नामंजूर केलेला आहे. वादींनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन निशाणी क्र.९५ वरील आदेशाविरुध्द मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथे अपिल करणार असलेचे कथन केले आहे. ख्रिश्चन धर्मीय कुटुंबामध्ये जर मुळ पुरुषाने मिळकत हस्तांतर करण्याबाबत कोणताही दस्त केला नसेल तर त्याच्या निधनानंतर भारतीय वारसा कायद्याचे कलम ४० अन्वये काही अपत्ये हयात असतील व काही अपत्यांचे निधन झाले असेल तर निधन झालेल्या अपत्यांच्या वारसांना हक्क प्राप्त होतो. उदा. अ, ब, क ही मुले असुन ड व इ या मुली आहेत असे मानले तर मुले व मुलींना समान हिस्सा येईल, तसेच अ, ब, क, ड, इ पैकी कोणी मयत असेल तर त्यांच्या वारसांना त्यांना मिळत असलेला हिस्सा मिळतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.१ ॲगोस्टीन हा अद्याप हयात आहे. त्यामुळे त्याच्या वारसांना म्हणजेच वादी क्र.१ ते ३ यांना प्रतिवादी क्र.१ च्या हयातीत दावा मिळकती वाटप होवुन मागणेचा कायदेशिर हक्क व अधिकार नाही. तसेच दावा मिळकतीत प्रथमदर्शनी वादींचा कब्जा असल्याबाबतच अभिलेखावर कोणताही पुरावा नाही. सबब वादींचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणेस सद्या तरी न्यायालयापुढे कोणताही सबळ पुरावा अथवा कारण नाही. याउलट प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी क्र.११ चे अपरिमित असे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच दाव्यातील गुंतागुंत वाढण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. परिणामतः मी प्रश्नबिंदु क्र.१ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे व न्यायाचे उद्दिष्ट साधण्याकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by VASIM BURAN MULLA
Date: 2023.11.09 15:57:00 +0530

स्थळ : गारगोटी. **( व्ही. बी. मुल्ला )**
दिनांक : ०९/११/२०२३. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी.